| HPU240000062021 | **फौ.की.अर्ज.न.१ / २०२१**<br>**प्रणाली संदेश भालेराव**<br>Vs.<br>**संदेश बबनराव भालेराव** |
| --- | --- |

**फौ.की.अर्ज ०१ / २०२१ मधील नि.४७ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज जाबदेणार क्र. १ यांनी त्यांचेविरूध्द झालेला 'No Cross' आदेश बाजूला करण्यासाठी दाखल केला आहे. अर्ज वाचला. त्यावर अर्जदारतर्फे लेखी खुलासा घेण्यात आला.

२. जाब देणार यांच्या अर्जातील कथनानुसार, जाब देणार क्र. १ यांनी मागील तारखेस न्यायालयात हजर होते. परंतु, त्यांची वकील हे आजारी असल्यामुळे मागीत तारखेस न्यायालयात हजर राहु शकले नाहीत. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांच्या विरूद्ध उलटतपास नाही चा आदेश झालेला आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास जाब देणार यांचे कधीही भरून न येणारे असे नुकसान होणार आहे. अर्जदार यांची उलटतपासणी होणे आवश्यक आहे. जाबदेणार यांना अर्जदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे काहीही नुकसान होणार नाही. उलटपक्षी न्यायदानास मदतच होणार आहे. सबब अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३. अर्जदारातर्फे सदर अर्जावर म्हणणे देवुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या कथनानुसार अर्जदार यांनी सुमारे दिड ते दोन वर्षांनी अर्जामध्ये त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यानंतर दि. ०५.०२.२०२४ रोजी अर्जदाराने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. जाबदेणार हे जाणिवपुर्वक अर्जाचे कामकाज लांबवण्यासाठी कोर्टापुढे येत नाहीत. त्यामुळे त्यांचेविरूद्ध उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा. अर्ज मंजुर करण्याचे मत झाल्यास जास्तीत जास्त दंड आकारावा.

४. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन

केले असता, अर्जदार हिने दि. ०५.०२.२०२४ रोजी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु, जाबदेणार यांनी वेळोवेळी उलटतपास घेण्याकरीता मुदत घ ेतलयाचे दिसुन येते. जाबदेणातर्फे उलटतपास न घेतल्याने जाबदेणार यांचे विरुध्द दिनांक ०८.०८.२०२४ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. त्यामुळे जाबदेणार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास अर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नसून उलटपक्षी जर अर्ज नामंजुर केला तर नक्कीच प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, अशा परिस्थितीत सदर अर्जात नमुद केलेल्या कारणांचा न्यायबुध्दीने विचार करता, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून अर्जदाराच्या पुराव्याचे खंडन करण्याची जाबदेणार क्र. १ यांना संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत, जाबदेणार यांचेवर योग्य तो खर्च लादुण अर्ज निर्गत करणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालीलप्रमाणे न्यायोचित असा आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. ४७ मंजुर करण्यात येतो.

२. जाबदेणार विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रक्कम रूपये ५००/—(रूपये पाचशे मात्र) इतका खर्च अर्जदारास देण्याचे अटीवर रदद् करण्यात येत आहे.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.12.10 13:14:26 +0530

**(श्रीमती. एम. एस. माळी)**

दि. ०७.१२.२०२४

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव.